## नियमित दिवाणी दावा क्र. ४८/२०१४ मधील नि.क्र. ९७ वरील आदेश

(CNR NO MHRG140003772014)

१. सदरचा अर्ज वादी यांनी नि.क्र. ८६ कडील दिवाणी प्रक्रीया संहिता ७ नियम ११ प्रमाणे दाखल अर्जावर पारीत झालेला 'विना म्हणणे आदेश' रद्द करुन म्हणणे अभिलेखावर दाखल करणेची परवानगी देण्याकरीता केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी सदर अर्जावर म्हणणे देवून सक्त हरकत घेतली आहे. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, वादीने सदरचा आदेश रद्द करणेसाठी योग्य कारण अर्जात नमुद केलेले नाही. तरी सदरचा अर्ज जास्तीत जास्त खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता ७ नियम ११ प्रमाणे दाखल केला आहे. वादी असे कथन करतात की, सदर वादी हे वयस्कर असून त्यांना कायद्याचे ज्ञान अपुरे असल्याने व त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना म्हणणे देण्याकरीता आवश्यक माहिती व कागदपत्रे जमा करु शकलेले नाहीत. वादींना म्हणणे दाखल करण्यास विलंब झाल्याने त्यांचेविरुध्द विना म्हणणे आदेश पारीत झालेला आहे.

५. सदर वादी हे त्यांचे म्हणणे दाखल करुन त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर वादींविरुध्द न्यायालयाने पारीत

केलेला विना म्हणणे आदेश रद्द होवून त्यांचे म्हणणे अभिलेखावर घेणे योग्य होईल. सदर वादी यांनी त्यांचे म्हणणे मुदतीमध्ये दिले नसल्यामुळे जो असोइस्करपणा झाला त्याकरीता वादी यांस खर्च लावून त्यांचा अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | वादी यांचा अर्ज रक्कम रु. २५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | वादी यांनी रक्कम रु. २५०/– प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना देण्यात यावी. |
| ३ | सदर खर्चाची रक्कम वादींनी पुढील नेमल्या तारखेच्या आत प्रतिवादींना द्यावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजणेत येईल. |

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – ०३.१०.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.